सीबीसी ३० अ १२२००९
आरबीआय / २००९-१०/११९
डीबीओडी क्र. एलईजी. बीसी. ३०/०९.०७.००५/२००९-१० ऑगस्ट १२,२००९

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

महोदय,

**बँकांनी गोठविलेल्या खात्यांवर व्याज-प्रदान**

कृपया, ग्राहक - सेवेवरील आमचे महापरिपत्रक डीबीओडी. क्र. एलईजी. बीसी. ९/०९.०७.००६/२००९-१० दि. जुलै १, २००९ च्या परिच्छेद ५.८.९ चा संदर्भ घ्यावा. त्यात, अंमलबजावणी प्राधिकरणांनी गोठविलेल्या मुदत - ठेव खात्याबाबत करावयाच्या कार्यरीतींचे पालन करण्यास बँकांना सांगण्यात आले होते.

२) परिच्छेद ५.८.९ (१) च्या तरतुदींनुसार, बँकांना सांगण्यात आले होते की, त्यांनी, ठेव परिपक्व झाल्यावर, मूळ मुदती एवढ्या मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी, ग्राहकाकडून विनंतीपत्र घ्यावे. पुनर्विचार केल्यावर, असे दिसत आहे की, मूळ मुदती एवढ्याच मुदतीचे नूतनीकरण करण्याऐवजी, त्या ठेवीचे नूतनीकरण करण्याच्या मुदतीसाठी ग्राहकाला पर्याय देण्यात यावेत.

३) ह्यासाठी, नूतनीकरणासाठी ग्राहकाकडून विनंतीपत्र घेतेवेळी, बँकांनी ती ठेव किती मुदतीसाठी नूतनीकृत करावयाची आहे हे निर्देशित करण्यास ग्राहकाला सांगावे. नूतनीकरणाबाबतचा पर्याय ग्राहकाने न निवडल्यास, बँका, त्या ठेवीचे मूळ मुदतीएवढ्याच कालावधीसाठी नूतनीकरण करू शकतात.

आपला,

(बी. महापात्रा)
मुख्य व्यवस्थापक.